# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२२

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### परतूर नगरपरिषद (जि.जालना) हद्दीतील जमिनीची अनधिकृतपणे तसेच बेकायदेशीररित्या खरेदी-विक्री केल्याबाबत

**(१) ११८३४ (३०-०३-२०२२) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परतूर नगरपरिषद (जि.जालना) हद्दीतील आणि महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळांतर्गत नोंदणीकृत असलेल्या एका संस्थेकडील इनामी जमिनीची अनधिकृतपणे, बेकायदेशीररित्या खरेदी-विक्री केल्याप्रकरणी नऊ जणांच्या विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू जमिनीची अनधिकृतपणे, बेकायदेशीररित्या खरेदी-विक्री केल्याप्रकरणी दोषी आढळून आलेल्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०९-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) अतिक्रमण हटविण्यासाठी वक्फ अधिनियमातील तरतुदींनुसार कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

---

### राज्यातील वृत्तपत्र विक्रेत्यांना आर्थिक सहाय्य आणि अपघात विमा देण्याबाबत

**(२) ११९०८ (३०-०३-२०२२) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वाचक आणि वृत्तपत्र यांच्यातील महत्त्वाचा दुवा असणाऱ्या वृत्तपत्र विक्रेत्यांना कोरोनाच्या संकटातून सावरण्यासाठी ओडीसा शासनाच्या धर्तीवर आर्थिक सहाय्य देण्याची तसेच अपघातासाठी आर्थिक कवच लागू करण्याची मागणी बृहन्मुंबई वृत्तपत्र विक्रेता संघाने शासनाकडे दिनांक १ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने राज्यातील वृत्तपत्र विक्रेत्यांना कोरोनाच्या संकटातून सावरण्यासाठी आर्थिक सहाय्य आणि अपघात विमा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (२२-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) दिनांक १३/०८/२०२० च्या शासन निर्णयान्वये असंघटीत कामगारांचे ३०० प्रकारच्या व्यवसायात वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यामध्ये वृत्तपत्र विक्रेता हा अ.क्र.१२७ वर नमूद केलेला आहे. दिनांक ०३/०४/२०१८ च्या शासन अधिसुचनेव्दारे गठित केलेले महाराष्ट्र राज्य सामाजिक सुरक्षा मंडळ हे सर्वसमावेशक असून, या मंडळामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांचे लाभ वृत्तपत्र विक्रेता यांना देखील लागू राहणार आहेत.

केंद्र शासनाने विकसित केलेल्या ई-श्रम पोर्टलवर सद्य:स्थितीत राज्यातील १,२७,४४,८५३ असंघटित कामगारांची नोंदणी झालेली आहे. यामध्ये वृत्तपत्र विक्रेता यांचाही समावेश आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील महाविद्यालये आणि विद्यापीठांमधील प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३) १२३७१ (३०-०३-२०२२) श्री.किशोर दराडे, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये रिक्त असलेली प्राध्यापकांची पदे भरण्याची मागणी सातत्याने नेट-सेट,पीएचडी पात्रताधारक उमेदवारांकडून करण्यात येत असून राज्यात प्राध्यापकांची २ हजार ८८ आणि प्राचार्यांच्या ३७० रिक्त पदांची भरती प्रक्रिया राबविण्यास शासनाने मान्यता दिल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील महाविद्यालयीन प्राध्यापकांचा नेट-सेट चा प्रश्न, प्राध्यापक भरतीचा प्रश्न, तासिका तत्वावरील प्राध्यापकांचे मानधन यासारख्या इतर विविध प्रश्नांसाठी मा.मंत्री महोदयांबरोबर औरंगाबाद विभागातील शिक्षक लोकप्रतिनिधींनी आयोजित केलेल्या माहे मार्च, २०२१ व दिनांक १७ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(३) तसेच, राज्यातील वरिष्ठ महाविद्यालये व विद्यापीठात माहे डिसेंबर, २०२१ अखेर प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकांची एकूण रिक्त पदे किती आहेत, आतापर्यंत किती रिक्त पदे भरण्यात आली, सदरील प्रक्रियेला मान्यता देऊन त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू प्राध्यापक, प्राचार्य व शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (०१-०९-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) याअनुषंगाने राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांच्या अनुषंगाने आढावा घेऊन त्याअनुषंगाने शासनास शिफारस करण्यासाठी

श्री.धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित लोकप्रतिनिधी व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी यांचा समावेश असलेल्या समितीचे गठन करण्यात आलेले आहे.

(२) व (३) होय.

दिनांक ०१/१०/२०१७ च्या विद्यार्थीसंख्येनुसार उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या ११७१ अशासकीय अनुदानित महाविद्यालयांत सहाय्यक प्राध्यापकांच्या अनुज्ञेय ३११८५ पदांपैकी २२२३६ पदे भरलेली असून ८९४९ पदे रिक्त आहेत. यापैकी ४०% च्या मर्यादेत ३५८० पदांना वरिष्ठ सचिव समितीने मान्यता दिलेली असून यामधील १४९२ पदे भरण्यात आलेली आहेत आणि उर्वरित २०८८ पदे भरण्यास शासनाच्या दिनांक १२/११/२०२२ च्या आदेशान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत सुधारित आरक्षण धोरणानुसार तपासणी करून पदभरतीची प्रक्रिया सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शहरी नगरपालिका व महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या शाळा व महाविद्यालयांना करामध्ये सवलत देण्याबाबत

**(४) १२५४५ (३०-०३-२०२२) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शहरी नगरपालिका व महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या शाळा व महाविद्यालयांना करा (tax) मध्ये सवलत मिळणेबाबत कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील शहरी नगरपालिका व महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या शाळा व महाविद्यालयांना कर (tax) मध्ये सवलत देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-०९-२०२२) :** (१) व (२) राज्यातील शहरी नगरपालिका अंतर्गत महाराष्ट्र नगरपरिषदा (एकत्रित मालमत्ता कर) नियम, १९६९ च्या कलम १०(२) नुसार कर आकारणी वेळी करयोग्य मूल्यावर निम्म्या दराने कर आकारणी करण्यात येते.

महानगरपालिका क्षेत्रातील ज्या शैक्षणिक व सेवाभावी संस्था, धर्मदाय कार्यालयाकडे नोंदणी केली आहे त्या संस्थांना इमारती मधील वाणिज्य वापर वगळून इतर वापराच्या क्षेत्रावर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या निवासी वापरासाठी मासिक भाडे दरानुसार कर आकारणी करण्यात येते. तसेच धर्मदाय कार्यालयाकडे नोंदणी केलेल्या शैक्षणिक व सेवाभावी संस्थांच्या इमारतींना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १३२(१)(ब) नुसार सर्व साधारण कर, कलम १४८ क नुसार रस्ता कर व महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी कायदा १९६२ मधील कलम ७(९) नुसार शिक्षण करात सवलत देण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात कोविड रुग्णांवरील उपचारासाठी आवश्यक असलेली संरक्षक औषधे खरेदी करण्याबाबत

**(५) १२५८० (३०-०३-२०२२) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोविड रुग्णांवरील उपचारासाठी आवश्यक असलेल्या जीव संरक्षक औषधांचा (Life saving drugs) तुटवडा निर्माण झाला असून सदर औषधे खरेदी करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(२) तसेच, आयसेरा व सिप्ला इत्यादी कंपन्यांकडून कोरोनावरील उपचाराकरीता तयार करण्यात येणाऱ्या औषधांची आवश्यकता आणि त्याचे होणारे परिणाम याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१८-०८-२०२२) :** (१) राज्यात कोविड रुग्णांवरील आवश्यक असलेली जीव संरक्षक औषधांचा (Life saving drugs) हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ मर्यादित खरेदी कक्ष, मुंबई यांचेमार्फत खरेदी प्रक्रियेव्दारे आरोग्य संस्थांना उपलब्ध करुन देण्यात आलेला औषध साठा पुरेशा प्रमाणात राज्यात उपलब्ध आहे.

(२) कोरोनावरील नवीन उपलब्ध होणारी औषधे आणि त्यांची परिणामकारकता याबाबत आय.सी.एम.आर. (भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषद) ही शिखर संस्था वेळोवेळी मार्गदर्शन करत असते. त्यानुसार या औषधांचा उपयोग केला जातो.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील नागरिक, शेतकरी व व्यापारी वर्गाला खरेदी विक्री व इतर व्यवहाराकरीता मुद्रांक शुल्कामध्ये सवलत देण्याबाबत

**(६) १२८२७ (३०-०३-२०२२) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात कोरोनाची परिस्थिती लक्षात घेता खरेदी विक्री व इतर व्यवहाराकरीता मुद्रांक शुल्क सन २०२२-२०२३ या कालावधी करीता शासन कमी करणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील दोन वर्षामध्ये सततच्या लॉकडाऊनमुळे नागरिकांना व व्यापारी वर्गाला मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्यामुळे खरेदी विक्री व इतर व्यवहारावर राज्यात महसुली उत्पनावर परिणाम झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने नागरिक, शेतकरी व व्यापारी वर्गाला खरेदी विक्री व इतर व्यवहाराकरीता मुद्रांक शुल्कामध्ये सवलत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२६-०८-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात कोरोनामुळे मृत्यू पावलेल्या शासकीय मुद्रांक विक्रेत्यांच्या वारसांना मुद्रांक विक्रीचे लायसन्स हस्तांतर करण्याबाबत

**(७) १३१२२ (३०-०३-२०२२) डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोनाच्या काळात मृत्यू पावलेल्या शासकीय मुद्रांक विक्रेत्यांच्या वारसांना मुद्रांक विक्रीचे लायसन्स हस्तांतर होत नसल्याने त्यांच्या कुटुंबाना आर्थिक अडचणीस सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या मृत मुद्रांक विक्रेत्यांचे लायसन्स त्यांच्या वारसांना हस्तांतरीत करणे किंवा नवीन लायसन्स देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२६-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.मुद्रांक-२००४/३६८९/(०३)/प्र.क्र.३८/म-१, दिनांक २४/०९/२०१० नुसार खाजगी व्यक्तींना मुद्रांक विक्री परवाने देणेचे कायमस्वरुपी बंद केलेले आहे.
तसेच मुंबई मुद्रांक पुरवठा व विक्री नियम १९३४ मध्ये मुद्रांक विक्रेत्याच्या मृत्यूपश्चात त्यांचा परवाना वारसांना हस्तांतरण करण्याची कोणतीही तरतुद नाही. तसेच विशेष बाब म्हणूनही मुद्रांक विक्रेत्याच्या निधनानंतर वारसास परवाना हस्तांतरणाची तरतुद नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या वनसेवा मुख्य परीक्षा भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय देण्याबाबत

**(८) १३२४० (३०-०३-२०२२) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) घेण्यात आलेल्या वनसेवा मुख्य परीक्षा २०१९ साठी भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (ऑप्टिंग आऊट) पर्याय देण्याची मागणी काही उमेदवारांकडून करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात (मॅट) दाद मागण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू मागणीवर शासनाने चौकशी करुन कोणता निर्णय घेतला आहे, असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे,
(४) उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०९-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) आयोगाच्या दिनांक ६ एप्रिल, २०२२ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकान्वये विषयाधीन परीक्षेच्या भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (ऑप्टिंग आऊट) चा पर्याय गुणवत्ता यादीतील सर्व उमेदवारांना उपलब्ध करुन दिला आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला परीक्षा आयोजनाचे कर्तव्य संविधानाने कलम ३२० अन्वये दिले असून आयोगाच्या सदर कार्यात शासनाचा हस्तक्षेप नसतो.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## राज्य लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षा वेगवेगळ्या दिवशी घेण्याबाबत

**(९) १३२६७ (२०-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य लोकसेवा आयोगामार्फत राज्यसेवा पूर्व परीक्षा व भूमि अभिलेख विभागाच्या भुमापक व लिपिक संवर्गाची भरती परीक्षा दिनांक २३ जानेवारी, २०२२ रोजी घेण्याचे नियोजित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दोन्ही महत्वपूर्ण परीक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात आल्याने दोन्ही परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये नाराजी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यावरुन शासनाच्या या दोन्ही विभागासह इतरही विभागात समन्वय नसल्याचे निदर्शनास आले असून यापुढे घेण्यात येणाऱ्या परीक्षा एकाच दिवशी होणार नाही याची खबरदारी घेण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०९-२०२२) :** (१) हे खरे नाही.

केवळ राज्यसेवा पूर्व परीक्षा-२०२१ ही दिनांक २३ जानेवारी, २०२२ रोजी घेण्यात आली.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## राज्यातील तुकडेबंदी कायद्यातील सुधारित आदेशानुसार तुकड्याची विक्री करण्याकरिता प्रातांधिकाऱ्यांची परवानगी घेण्याबाबत

**(१०) १३२७९ (३०-०३-२०२२) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तुकडे बंदी व तुकडे जोड कायदयात शासनाने दुरुस्ती केली असून आता सुधारित आदेशानुसार ४० गुंठ्यापेक्षा कमी जागेच्या व्यवहारासाठी प्रातांधिकारी यांची परवानगी आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगली जिल्ह्यातील कडेगाव तालुक्यात या नियमाकडे दुर्लक्ष करुन प्रांताधिकाऱ्यांची परवानगी न घेता दस्त नोंदणी सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रांताधिकाऱ्यांची परवानगी न घेता दस्त नोंदणी सुरु करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२६-०८-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

यासाठी राज्यातील वेगवेगळया जिल्ह्यात, तालुक्यात वेगवेगळे प्रमाणभूत क्षेत्र निश्चित करण्यात आले असून तुकड्याची विक्री करण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याची परवानगी घेणे आवश्यक आहे.
(२) तत्कालीन प्रभारी दुय्यम निबंधक यांनी दिनांक १२/०७/२०२१ ते दिनांक ३१/१२/२०२१ या कालावधीत नोंदविलेल्या दस्तांची तपासणी सह जिल्हा निबंधक सांगली यांनी केली असून सदर तपासणीमध्ये १५८ दस्तांमध्ये तुकडेबंदी कायदयातील प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे व्यवहार परवानगी शिवाय झाले असल्याचे आढळून आले आहे.
(३) याप्रकरणी तत्कालीन प्रभारी दुय्यम निबंधक श्रेणी-१, कडेगांव यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर वाहतूक व्यवस्थापन यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत

**(११) १३४७८ (२०-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे अधिनस्थ असलेल्या मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर वाहतूक व्यवस्थापन यंत्रणा (इंटेलिजेंट ट्रॅफीक मॅनेजमेंट सिस्टीम) बसविण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याकरीता राज्य शासनाने रुपये ४० कोटी निधी मंजूर करुनही महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने निविदा प्रक्रिया जारी करुनही अद्यापपर्यंत कामाला अंतिम स्वरुप देण्यात आले नाही, त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर वाहतूक व्यवस्थापन यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (१५-०९-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) निविदा प्रक्रिया पूर्ण करुन निविदेतील अटिनुसार विविध वाहतूक नियमांच्या भंगापोटी वसुल करण्यात येणाऱ्या दंडाच्या रकमेचा वाटा कंत्राटदारास अदा करणे, तसेच यासाठी Escrow Account आवश्यक

असल्याने तसा प्रस्ताव मंजूरीसाठी शासनास सादर करण्यात आला असून मंजूरीची कार्यवाही गृह विभागामार्फत होत आहे. सदर मंजूरी नंतर कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सामाजिक न्याय विभागातील संचलित विद्यार्थी वसतिगृहे सुरू करणेबाबत

**(१२) १३४८९ (२९-०४-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-१
(१) राज्यातील महाविद्यालये दिनांक १ फेब्रुवारी, २०२२ रोजीपासून वा त्यादरम्यान शासन निर्णयानुसार सुरू करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या दारिद्रय रेषेखालील मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरीता सामाजिक न्याय विभागातर्फे वसतिगृहे अद्यापपर्यंत सुरू न झाल्याने हे विद्यार्थी शिक्षणापासून व इतर शैक्षणिक सुविधेपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सामाजिक न्याय विभागातर्फे वसतिगृहे अद्यापही सुरु न होण्याची कारणे काय आहेत, गरीब मागासवर्गीय विद्यार्थ्यांची गैरसोय लक्षात घेता शासन सदर वसतिगृहे कधीपासून सुरु करणार आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने महाविद्यालयीन दारिद्रय रेषेखालील मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरीता सामाजिक न्याय विभागातर्फे वसतिगृहे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०८-२०२२) :** (१) होय.
(२) नाही.
(३) व (४) शासन पत्र दिनांक २१ जानेवारी, २०२२ चे पत्र व समाज कल्याण आयुक्तालयाचे पत्र दिनांक २१/०१/२०२२ अन्वये दिनांक २४ जानेवारी, २०२२ पासून सामाजिक न्याय विभागांतर्गत शासकीय वसतिगृहे सुरू करण्यात आलेली आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हिंगणा (जि.नागपूर) तालुक्यातील दुरवस्था झालेल्या मार्गाची दुरुस्ती करण्याबाबत

**(१३) १३५९२ (२०-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर-मुंबई द्रुतगती समृध्दी महामार्ग हिंगणा (जि.नागपूर) तालुक्यातील भागातून जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समृध्दी महामार्गाच्या बांधकामाकरीता बांधकाम साहित्य घेवून जाणाऱ्या अवजड वाहतुकीमुळे तालुक्यातील राज्यमार्ग, प्रमुख जिल्हामार्ग, इतर जिल्हामार्ग व इतर जोडरस्त्यांची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने समृध्दी महामार्गाच्या बांधकामामुळे हिंगणा (जि.नागपूर) तालुक्यातील बाधित होऊन दुरवस्था झालेल्या मार्गाची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण (१५-०९-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) कंत्राटातील अट क्रमांक ९, १ व १०.४ प्रमाणे समृध्दी महामार्गाच्या कामाकरीता अवजड वाहनांकरीता उपयोगात आणलेले रस्ते त्यांच्या उपयोगाच्या कालावधीत सुस्थितीत ठेवण्याचे निर्देशित करण्यात आले आहे. समृध्दी महामार्गाच्या प्रकल्पाच्या बांधकामाकरीता आवश्यक बांधकाम साहित्याच्या वाहतुकीकरीता कंत्राटदाराने हिंगणा तालुक्यातील, सार्वजनिक बांधकाम / जिल्हा परिषद विभागाच्या अखत्यारीतील ६ रस्ते उपयोगात आणले होते. या संदर्भात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने कंत्राटदारास वेळोवेळी तोंडी व लेखी आदेश देऊन रस्ता दुरुस्तीबाबत निर्देशित केलेले आहे. त्याप्रमाणे प्रकल्पाच्या बांधकाम कालावधीत कंत्राटदारामार्फत सदर रस्त्याची वेळोवेळी डागडूजी करण्यात येऊन रस्ते वाहतूक योग्य ठेवण्यात आली आहे. सद्य:स्थितीत उक्त रस्ते पूर्ववत करण्याचे काम कंत्राटदारामार्फत हाती घेण्यात आले असून दिनांक २० जून, २०२२ पर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजित आहे. तसेच, या बाबींकरीता कंत्राटदाराच्या देयकातून रुपये १५ लख रोखून ठेवण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दिवाणी न्यायधीश व न्यायदंडाधिकारी स्तरावरील पदांच्या भरती परिक्षांचे निकाल जाहीर करण्याबाबत

**(१४) १३६२० (२०-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिवाणी न्यायाधीश व न्यायदंडाधिकारी स्तरावरील पदांच्या भरती प्रक्रियेच्या मुख्य परीक्षा माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये घेण्यात येवून सुमारे सहा महिन्यांचा कालावधी होऊनही परिक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला नसल्याचे माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगांच्या परिक्षांचे निकाल ७० दिवसांत जाहीर होणे अपेक्षित असताना सदरहू परिक्षांचे निकाल जाहीर न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिवाणी न्यायाधीश व न्यायदंडाधिकारी स्तरावरील पदांच्या भरती परिक्षांचे निकाल जाहीर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०९-२०२२) :** (१) हे खरे नाही.

दिवाणी न्यायाधीश व न्यायदंडाधिकारी स्तरावरील पदाची मुख्य परीक्षा दिनांक २५ सप्टेंबर, २०२१ रोजी घेण्यात आली. प्रस्तुत मुख्य परीक्षेचा निकाल दिनांक ११ फेब्रुवारी, २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आला.

(२) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांचे निकाल ७० दिवसात जाहीर करण्याच्या अनुषंगाने कोणताही नियम अथवा तरतुद विहित नाही.

(३) दिनांक ५ एप्रिल, २०२२ रोजी प्रस्तुत पदाचा अंतिम निकाल प्रसिध्द करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कपोल विद्यानिधी इंटरनॅशनल शाळेविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(१५) १४०४० (३०-०६-२०२२) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील कांदीवलीच्या महावीरनगर परिसरात असलेल्या कपोल विद्यानिधी इंटरनॅशनल शाळेतील १५ विद्यार्थ्यांना शुल्क न भरल्याच्या कारणास्तव वर्गामधून वेगळे करत वर्ग सुटेपर्यंत प्रयोगशाळेत बसवून ठेवल्यामुळे पालकांनी कांदिवली पोलीस ठाण्यात शाळेच्या प्राचार्यांसह तिघांवर गुन्हा दाखल केला असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकारामुळे विद्यार्थ्यांच्या मनावर परिणाम झाला असून त्यांनी शाळेत जाण्यास नकार दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळेच्या प्रवेशव्दारावर काळया गणवेशात असलेली महिला व पुरुष हे बाऊन्सर असल्याचा दावा पालकांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, सदर चौकशीअंती कपोल विद्यानिधी इंटरनॅशनल शाळेविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०२-०९-२०२२) :** (१) होय, तक्रारदार यांनी दिनांक ०४/०४/२०२२ रोजी दिलेल्या तक्रारीवरुन कपोल विद्यानिधी इंटरनॅशनल स्कुलच्या प्राचार्या व दोन शिक्षिका यांचे विरोधात कांदिवली पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ४३७/२२, कलम २३ बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम २००० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(२) सदर प्रकरणी विद्यार्थीचे जबाब घेतले असता त्यांच्या मनावर कोणताही परिणाम झाला नसल्याबाबत त्यांनी जबाबामध्ये नमूद केलेले आहे. तसेच, सदर मुले शाळेत नियमित जात आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) सदर प्रकरणात कांदिवली पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल असून तपासाधीन आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात दिव्यांगासाठी 'एडीआयपी' व ज्येष्ठ नागरीकांसाठी 'राष्ट्रीय वयोश्री योजना' राबविण्याबाबत

**(१६) १४८७० (०४-०७-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयामार्फत दिव्यांगासाठी एडीआयपी आणि ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरीकांसाठी 'राष्ट्रीय वयोश्री योजना' अंमलात आणली असून सदरहू योजना देशात सर्वप्रथम नागपूर येथे राबविण्याचे निश्चित झाले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू योजना नागपूर जिल्हापरिषदेच्या समाज कल्याण विभागाने ग्रामीण भागात राबविण्यास नकार दिला असून समाजकल्याण समितीने दिनांक २८ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत असहमती दर्शविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर जिल्हा परिषदेच्या असहकारामुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागामधील दिव्यांग व ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरीक योजनेच्या लाभापासून वंचित राहून सामान्य जनतेत तीव्र असंतोष निर्माण होण्याची शक्यता असल्याने शासन जिल्हापरिषदेस योग्य निर्देश देणार आहे काय, किंवा अन्य पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देणार काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयामार्फत दिव्यांगासाठी एडीआयपी आणि ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरीकांसाठी 'राष्ट्रीय वयोश्री योजना'राबविली जावी, याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) नागपूर जिल्ह्यातील १३ तालुक्यामध्ये अलिम्को, कानपूर यांच्यामार्फत दिनांक २९/०४/२०२२ ते दिनांक २७/०५/२०२२ पर्यंत शिबिरांचे आयोजन करण्यात आले. सदर शिबिरामध्ये एकूण ६९९६ इतक्या लाभार्थ्यांची तपासणी करण्यात आलेली आहे. नागपूर जिल्हा परिषदेने त्यांच्या ५ टक्के दिव्यांग कल्याण सेस फंडामधून आवश्यक निधी समाज कल्याण विभाग यांना उपलब्ध करुन दिलेला आहे.

सदर शिबिरामध्ये पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांना आवश्यक साहित्याचे वाटप अलिम्को यांच्या समन्वयाने करण्याची कार्यवाही जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे मार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे नांदुर (ता.आष्टी, जि.बीड) येथील चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणेबाबत

**(१७) १४९६६ (०४-०७-२०२२) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नांदुर (ता.आष्टी, जि.बीड) येथे दिनांक ८ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास आलेल्या चक्रीवादळामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नुकसानीचे पंचनामे होऊनही शासनाकडून मदत मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तातडीने मदत न मिळाल्यास नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यास त्याची जबाबदारी शासनावर असल्याचे निवेदन संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी तहसिलदार, जिल्हाधिकारी, जिल्हा कृषी अधीक्षक यांना दिनांक २२ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने मौजे नांदुर (ता.आष्टी, जि.बीड) येथील चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१८-०८-२०२२) :** (१) खरे आहे.

(२) सदरच्या कालावधीत झालेल्या नुकसानीकरीता विहित निकषानुसार देण्याकरीता निधी मागणीचे प्रस्ताव संबंधित विभागीय आयुक्तांकडून प्राप्त झाल्यावर राज्य कार्यकारी समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येतात. राज्य कार्यकारी समितीच्या मान्यतेनंतर निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येईल.

(३) होय, श्री.उध्दव विधाने, रा. नांदूर, जि.आष्टी यांनी दिनांक ०८/०६/२०२२ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांना निवेदन सादर केले आहे.

(४) दिनांक २२/०६/२०२२ रोजी वादळी वाऱ्यामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीच्या प्रस्तावास राज्य कार्यकारी समितीच्या मान्यतेनंतर निधी उपलब्ध करून देण्याची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोळकेवाडी व कोंडफणसवणे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) गावातील प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन मिळण्याबाबत

**(१८) १५०१७ (०४-०७-२०२२) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक ११८५५ ला दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयना जलविद्युत प्रकल्पाच्या चौथ्या टप्प्यामुळे बाधित झालेल्या कोळकेवाडी व कोंडफणसवणे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) या गावातील एकूण ४२३ प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीनी देण्यासंदर्भात मार्गदर्शनपर प्रस्ताव विभागीय आयुक्त, कोकण यांच्या कार्यालयामार्फत शासनास प्राप्त झाला असल्याची बाब दिनांक १४ जून, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावातील शिफारशींचे थोडक्यात स्वरूप काय आहे तसेच उक्त प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनी देण्यासंदर्भात मार्गदर्शनपर प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-०८-२०२२) :** (१), (२) व (३) कोयना जलविद्युत प्रकल्प टप्पा क्र. ४ मधील मौजे कोळकेवाडी व कोंडफणसवणे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील प्रकल्पग्रस्तांचे आर्थिक पुनर्वसन दिनांक ०४/०१/१९९६ व दिनांक ०९/१२/१९९७ रोजीच्या शासन निर्णयानुसार करण्यात आले आहे. प्रकल्पग्रस्तांनी सन २०१८ पूर्वी जमिनीची मागणी केल्याचे दिसून येत नाही. तद्नंतर प्रकल्पबाधित शेतकऱ्यांनी पर्यायी जमीन मिळण्याबाबतची मागणी सन २०१८ पासून केलेली आहे.

त्यामुळे कोयना जलविद्युत प्रकल्प टप्पा क्र.४ मधील प्रकल्प बाधित शेतकऱ्यांच्या पर्यायी जमीन मागणीच्या अनुषंगाने मार्गदर्शनपर प्रस्ताव विभागीय आयुक्त, कोकण यांच्या कार्यालयामार्फत शासनास प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने आवश्यक माहिती विभागीय आयुक्त कार्यालयाकडून मागविण्यात आलेली असून, त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वेस्ट ग्रील्ड सोल्युशन व ऊर्जा इंफ्राटेक ॲण्ड पॉवर प्रोजेक्ट प्रा.लि. कंपन्यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(१९) १५०१८ (०४-०७-२०२२) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वेस्ट ग्रील्ड सोल्युशन व ऊर्जा इंफ्राटेक ॲण्ड पॉवर प्रोजेक्ट प्रा. लि. कंपन्यांनी केलेल्या वित्तीय अनियमितता व गैरव्यवहार प्रकरणी शासनाने चौकशी करण्याचे आदेश दिले असल्याची बाब माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाचा चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, सदरहू अहवालात काय नमूद करण्यात आले आहे, तद्नुसार वित्तीय अनियमितता व गैरव्यवहार करणाऱ्या उक्त कंपन्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२४-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) वेस्ट ग्रील्ड सोल्युशन व ऊर्जा इंफ्राटेक ॲण्ड पॉवर प्रोजेक्ट प्रा. लि. या कंपन्यांनी केलेल्या वित्तीय अनियमितता व गैरव्यवहाराबाबत शासनाने दिनांक ०९/०५/२०२२ रोजी चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहेत. सदर चौकशी अध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांच्याकडून सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## किनवट (जि.नांदेड) शहरातील खंडीत होणारा वीज पुरवठा नियमित सुरु करण्याबाबत

**(२०) १५०३३ (२०-०७-२०२२) श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.नांदेड) शहरात प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे संपूर्ण दिवस वीजपुवठा खंडीत होत असल्याचे दिनांक १२ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून विजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणाने योग्य नियोजन करावे अशी मागणी ग्राहकांकडून केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, वारंवार खंडीत होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे सदर शहरातील लहान मुले, आजारी व्यक्ती, वृध्द व व्यापारी यांना समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने दैनंदिन खंडीत होणाऱ्या वीज पुरठ्यामुळे नागरिकांची होणारी गैरसोय टाळण्याच्यादृष्टीने किनवट (जि.नांदेड) शहरातील वीज पुरवठा तातडीने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२४-०८-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक ११/०६/२०२२ रोजी दुपारी ४.०० वाजेच्या सुमारास किनवट शहर व आजूबाजूच्या परिसरात वादळी वारे सुरु झाल्यामुळे तीन ११ के.व्ही वाहिन्या तांत्रिक बिघाडामुळे बंद झाल्या होत्या.

(२) हे खरे नाही.

(३) दिनांक ११/०६/२०२२ रोजी दुपारी ४.०० वाजेच्या सुमारास किनवट शहर व आजूबाजूच्या परिसरात वादळी वारे सुरु झाल्यामुळे तीन ११ के.व्ही. वाहिन्या तांत्रिक बिघाडामुळे बंद झाल्या होत्या. सदर उच्चदाब वाहिन्यांचे आवश्यक त्या ठिकाणी दुरुस्तीचे काम करण्यात आले व त्याच दिवशी रात्री १०.०० वाजेपर्यंत सर्व ठिकाणचा वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.